| MHAK070000742019 | **<u>नियमित दिवाणी दावा क्र. ८/२०१९ मधील</u>**<br>**<u>निशाणी ६० वर आदेश</u>**<br>**(दिनांक २३ एप्रिल, २०२४)** |
|---|---|

**१.** प्रस्तुत अर्ज त्रयस्थ व्यक्ती नामे १. पल्लवी जितेंद्र पोटदुखे, २. निता अरविंद घाटोळ आणि ३. सपना प्रल्हाद सोनटके यांनी दिवाणी प्रक्रीया संहिता आ.१ नि. १० (२) अन्वये दाव्यामध्ये प्रतिवादी म्हणून समाविष्ट करणेबाबत दाखल केलेला आहे.

**२.** <u>अर्जदार यांनी असे कथन केलेले आहे की</u>, वादी निलेश धनोकार यांनी सरसनिरस वाटणी होऊन, स्वतंत्र ताब्याकरीता व कायम मनाई हुकूम मिळण्याकरीता प्रतिवादी क्र.१ प्रभाकर धनोकार यांचे विरुध्द दाखल केलेला असून दाव्यामधील प्रतिवादी क्र.१ प्रभाकर धनोकार यांच्या दुस–या पत्नीच्या आम्ही मुली असल्यामुळे प्रभाकर धनोकार यांच्या संपुर्ण मालमत्तेमध्ये आमचा जन्मतः हक्क व अधिकार आहे. आम्ही तीन मुली विवाहीत असून आम्ही आमच्या पतीच्या घरी राहत आहोत. दावा मिळकतीमध्ये आमचा वारसा हक्क आहे, परंतु दाव्यामध्ये आम्हाला पक्षकार म्हणुन समाविष्ट केलेले नाही. सदर प्रकरण गुणवत्तेवर निकाली काढण्यासाठी आम्हाला सदर प्रकरणात प्रतिवादी म्हणुन समाविष्ट करणे आवश्यक आहे, सबब अर्ज मंजुर करण्यात यावा, अशी विनंती अर्जदार यांनी केली आहे.

**३.** <u>प्रतिवादी क्र.१</u> यांनी त्याच अर्जावर योग्य तो आदेश पारीत करावा, असे म्हणणे दाखल केले आहे. <u>प्रतिवादी क्र.२</u> यांनी त्याच अर्जावर प्रस्तुत अर्जास विरोध करुन असे कथन केले आहे की, प्रस्तुत अर्ज कायदेशिर नसल्यामुळे खारीज करण्यात यावा. <u>वादी यांनी नि.क्र.६१ नुसार त्यांचे म्हणणे दाखल करुन असे कथन केले आहे की</u>, प्रतिवादी प्रभाकर धनोकार यांची पत्नी जिवंत असून (वादी क्र.३) प्रतिवादी प्रभाकर धनोकार यास वादी क्र.१ व २ शिवाय कोणतेही कायदेशिर मुलबाळ नाही. अर्जदारांचा प्रस्तुत दाव्याशी कोणताही संबंध नसल्यामुळे आणि अर्जदारा विषयी वादीला पुसटशीही कल्पना नसल्यामुळे त्यांना दाव्यामध्ये समाविष्ट करण्यात आलेले नाही.

या पुढे असे कथन केले आहे की, अर्जदार क्र.१ ते ३ ह्या प्रतिवादी प्रभाकर धनोकार यांच्या दुस–या पत्नीपासून झालेल्या मुली आहेत हे विधान सुध्दा वादीवर अन्यायकारक असून प्रभाकर धनोकार यांची पहिली कायदेशिर पत्नी जिवंत असतांना दुस–या पत्नीशी झालेल्या मुली या कायदेशिर असल्यामुळे, परंतु त्या प्रभाकर धनोकार यांच्या कायदेशिर वारस ठरत नसल्यामुळे त्यांना दाव्यामध्ये प्रतिवादी म्हणून समाविष्ट करणे योग्य नाही. प्र. वादी क्र.१ प्रभाकर धनोकार यांनी अशाच प्रकारचा अर्ज दिनांक १२.०९.२०२३ रोजी नि.क्र.५६ नुसार दाखल केला होता, तो अर्ज दिनांक २६.१०.२०२३ रोजी दंडासह खारीज करण्यात आला आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ यांनी मुलींशी संगनमत करुन प्रस्तुत अर्ज दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.१ प्रभाकर धनोकार यांना स्वतःची मिळकत अस्तित्वात नसल्यामुळे अर्जदारांची मागणी गैरकायदेशिर आहे. प्रस्तुत दाव्यामध्ये अंशतः पुरावा झालेला असून अर्जदारांनी प्रतिवादी क्र.१ सोबत संगनमताने अर्ज सादर केलेला असल्यामुळे प्रस्तुत अर्ज खारीज करण्याची विनंती वादीने केली आहे.

**४.** अर्ज आणि म्हणणे पाहिले. प्रस्तुत अर्जातील अर्जदार क्र.१ ते ३ तर्फे विधीज्ञ श्री. ए.एस. सुळकर यांचा युक्तिवाद ऐकला. वादीतर्फे विधीज्ञ श्री. डी.एस. धारसकर यांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी क्र.१ तर्फे विधीज्ञ श्री. ए.जी. अवातिरक यांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी क्र.२ तर्फे विधीज्ञ श्री. एस.टी. इंगळे यांचा युक्तीवाद ऐकला.

**५.** प्रतिवादी क्र.१ प्रभाकर धनोकार यांनी प्रस्तुत अर्जावर यांनी योग्य तो आदेश पारीत करावा असे म्हणणे दाखल केले आहे, यावरुन असे दिसून येते की, अर्जदार क्र.१ ते ३ यांनी केलेली कथने प्रतिवादी क्र.१ प्रभाकर धनोकार यांनी नाकारलेली नाहीत. तसेच वादी यांनी नि.क्र.६१ वर दाखल केलेल्या जबाबामधील मुद्दा क्र.१ पान क्र.२ यामध्ये असे नमुद केले आहे की, अर्जदारांसंबंधी वादीला पुसटशीही कल्पना नसल्यामुळे त्यांनी अर्जदारांना प्रतिवादी म्हणून समाविष्ट केलेले नाही. यावरुन असे दिसून येत आहे की, जर वादीला प्रतिवादी क्र.१ प्रभाकर धनोकार यांच्या ३ मुली विषयी कल्पना असती तर त्यांनी त्यांना दाव्यामध्ये समाविष्ट केले असते. वादीच्या

म्हणण्यानुसार प्रतिवादी क्र.१ प्रभाकर धनोकार यांची पहिली पत्नी जिवंत असल्यामुळे दुस–या पत्नीशी झालेल्या मुली कायदेशिर ठरणार नाहीत.

६. दिवाणी प्रकिया संहिता आ. १ नि. १० (२) या तरतूदीचे अवलोकन केले असता, असे दिसून येत आहे की, दाव्याच्या कोणत्याही टप्प्यावर न्यायालय वादी, प्रतिवादी किंवा ज्या व्यक्तीची किंवा दाव्यातील सर्व प्रश्नांवर निकाल देण्यासाठी आणि दिलेला निकाल प्रभावीपणे आणि पुर्णपणे अंमलबजावणी करण्यासाठी न्यायालयासमोर ज्या व्यक्तीची उपस्थिती आवश्यक आहे, अशा व्यक्तीला दाव्यामध्ये समाविष्ट करता येईल. प्रस्तुत दावा हा वाटणी, स्वतंत्र ताबा, ठराव आणि खरेदीखत रद्द करण्यासाठी दाखल केलेला आहे. दाव्यातील पान क्र.४ मुद्दा क्र.३ मधील कथनांचे अवलोकन केले असता असे दिसून येत आहे की, वादीच्या म्हणण्यानुसार दावा मिळकती ह्या वादी आणि प्रतिवादी क्र.१ यांच्या वडीलोपार्जीत मिळकती आहेत. वादी क्र.१ हा प्रतिवादी क्र.१ प्रभाकर धनोकार चा मुलगा असून, वादी क्र.२ ही प्रतिवादी क्र.१ ची विवाहीत मुलगी आहे. वादी क्र.१ आणि २ हे वादी क्र.३ आणि प्रतिवादी क्र.१ यांची अपत्ये आहेत. त्याचप्रमाणे अर्जदार क्र.१ ते ३ नामे १. पल्लवी जितेंद्र पोटदुखे, २. निता अरविंद घाटोळ आणि ३. सपना प्रल्हाद सोनटके ह्या प्रतिवादी क्र.१ यांच्या दुस–या पत्नीपासून झालेल्या मुली आहेत, असे अर्जदारांनी कथन केलेले आहे. प्रतिवादी क्र.१ यांनी प्रस्तुत अर्जावर योग्य तो आदेश पारीत करावा असे म्हणणे दाखल केलेले आहे, त्यावरुन असे स्पष्ट दिसत आहे की, त्यांनी अर्जदार क्र.१ ते ३ ह्या त्यांच्या मुली असल्याचे नाकारलेले नाही. सबब, दि.प्र.सं. आ.१ नि.१० (२) "ज्या व्यक्तीची किंवा दाव्यातील सर्व प्रश्नांवर निकाल देण्यासाठी आणि दिलेला निकाल प्रभावीपणे आणि पुर्णपणे अंमलबजावणी करण्यासाठी न्यायालयासमोर ज्या व्यक्तीची उपस्थिती आवश्यक आहे.'' या तरतुदींनुसार अर्जदार क्र.१ ते ३ या दाव्यामध्ये आवश्यक पक्षकार असल्याचे दिसून येत आहे. दाव्याच्या या टप्प्यावर अर्जदार क्र.१ ते ३ या कायदेशिर वारस ठरतात किंवा नाही हे न पाहता, अर्जदार क्र.१ ते ३ यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक आहे. सबब, पुढील आदेश पारीत करण्यात येत आहे.

**: आ दे श :**

१) प्रस्तुत अर्ज (नि.क्र.६०) मंजुर करण्यात येत आहे.

२) त्रयस्थ व्यक्ती नामे **१.** पल्लवी जितेंद्र पोटदुखे, **२.** निता अरविंद घाटोळ आणि **३.** सपना प्रल्हाद सोनटके यांना दिवाणी प्रक्रिया संहित आदेश १ नियम १० (२) अन्वये प्रस्तुत दाव्यामध्ये प्रतिवादी क्र.३, ४ व ५ म्हणून समाविष्ट करण्यात यावे.

३) वादीने दाव्यामध्ये आवश्यक ती दुरुस्ती करुन दुरुस्त दाव्याची प्रत १४ दिवसांचे आत अभिलेखावर दाखल करावी.

VISHNU DATTARAO GITE

Digitally signed by VISHNU DATTARAO GITE
Date: 2024.04.23 17:49:32 +0530

दिनांक : २३/०४/२०२४.
ठिकाणः बाळापूर

**( विष्णु द. गिते )**
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
बाळापूर.

| | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same, word to word, as per the original order. | | |
| Name of the Court | :- | Jt. Civil Judge, J.D. & J.M.F.C., Balapur |
| Name of the Stenographer | :- | Ajay N. Hande |
| Date of Decision | :- | 23/04/2024 |
| Order signed by P.O on | :- | 23/04/2024 |
| Order uploaded on | :- | 23/04/2024 |